Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-10| October - 2025

Original Article

# प्राचीन भारतीय स्थापत्यकला

**डॉ. आर.सी. फाटक**

इतिहास विभाग प्रमुख,श्री शिवाजीराव पंडित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर गढी.ता.गेवराई, जि.बीड.

**Email:** drramhariphatak@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2025-171028
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 10
Pp. 125-129
October. 2025

**Submitted:** 19 Sept. 2025
**Revised:** 29 Sept. 2025
**Accepted:** 14 Oct. 2025
**Published:** 31 Oct. 2025

***सारांश***

*कलेच्या इतिहासात स्थापत्य कलेला महत्त्वाचे स्थान आहे. प्राचीन भारतीय स्थापत्यकला भारतीय संस्कृतीचा आत्मा व इतिहासाच्या पानावर कोरलेली अमूल्य संपत्ती आहे. सिंधू - सरस्वती संस्कृती पासून मौर्य , गुप्त , चालुक्य , राष्ट्रकूट आणि होयसळ अशा प्राचीन भारतीय विविध राजवंशांनी स्थापत्यकलेला स्वतंत्र ओळख दिली. हिंदू मंदिरे , बौद्ध स्तूप , जैन गुंफा त्याचप्रमाणे इस्लामी प्रभावाखालील स्थापत्य हे स्थापत्यकलेचे महत्त्वाचे टप्पे आहेत. या निबंधात स्थापत्यकलेचा इतिहास , शैली , तंत्रज्ञान , सामाजिक , धार्मिक पार्श्वभूमी आणि आजच्या संदर्भातील उपयोगिता यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.*

**प्रस्तावना**

प्राचीन स्थापत्यकला ही भारतीय सांस्कृतिक वारशाचा अविभाज्य घटक आहे.वैदिक परंपरा , वास्तुशास्त्र आणि धार्मिक संकल्पनावर आधारित ही कला केवळ दगडी संरचना नाही , तर समाजाच्या धार्मिक , तांत्रिक आणि कलात्मक उत्कर्षाची साक्ष देते.नागर , द्रविड आणि वेसर या प्रमुख शैलीतून प्रादेशिक वैशिष्ट्ये आणि राजकीय संरक्षकत्व यांचे दर्शन होते.खजुराहो बृहदेश्वर , हम्पी व होयसळेश्वर यासारखी मंदिरे आजही प्राचीन अभियांत्रिकी कौशल्य , कलात्मक , सूक्ष्मता आणि प्रतीकात्मकता अधोरेखित करतात.या संशोधनाचा उद्देश म्हणजे हिंदू स्थापत्यकलेचा ऐतिहासिक प्रवास , शैलगत भिन्नता , तांत्रिक घटक व आधुनिक काळातील उपयुक्तता यांचे विश्लेषण करणे होय.

**संशोधन पद्धती :**

साहित्य समीक्षा पद्धत,हिंदू स्थापत्यकलेवरील प्राचीन ग्रंथ , पुरातत्व अहवाल आणि संशोधकांची पुस्तके व संशोधन पेपरांचा अभ्यास करून निष्कर्ष.

**गृहीतक :**

1. हिंदू स्थापत्यकला ही केवळ धार्मिक आस्था व्यक्त करण्याचे साधन नसून ते सामाजिक , आर्थिक , धार्मिक आणि राजकीय जीवनाचे प्रतिबिंब आहे.
2. प्रादेशिक राजवंश धार्मिक तत्वज्ञान आणि तांत्रिक प्रगती यांच्या प्रभावाखाली मंदिर शैलीमध्ये सातत्याने परिवर्तन झाले.
3. प्राचीन हिंदू स्थापत्यतत्वे आधुनिक वास्तुकलेला शाश्वत व पर्यावरणपूरक डिझाईनसाठी प्रेरणा देतात.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ.आर.सी. फाटक, इतिहास विभाग प्रमुख, श्री शिवाजीराव पंडित कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर गढी. ता.गेवराई, जि. बीड.*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.17638935

OPEN ACCESS

**How to cite this article:**
*फाटक, . आर . सी . (2025). प्राचीन भारतीय स्थापत्यकला. Journal of Research and Development, 17(10), 125–129.* https://doi.org/10.5281/zenodo.17638935

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-10| October - 2025

**उद्देश**

1. स्थापत्यकलेचे ऐतिहासिक प्रवाह व शैलींचा अभ्यास करणे.
2. धार्मिक , सामाजिक व राजकीय घटकांचा स्थापत्यावर झालेला प्रभाव शोधणे.
3. आधुनिक काळात जतन व संवर्धनासाठी योग्य दिशा सुनवने.

**सिंधू, सरस्वती संस्कृती कालीन स्थापत्य :**

ही संस्कृती जगातील सर्वात प्राचीन आणि प्रगत नागरी संस्कृतीपैकी एक आहे. जी सिंधू आणि सरस्वती या नद्यांच्या खोऱ्यात आजच्या घग्गर नदीच्या खोऱ्यात वसलेली होती. प्रगत नगर नियोजन , सुनियोजित रस्ते , सांडपाण्याची उत्तम व्यवस्था , शेती व व्यापारातील विकास यासाठी ही संस्कृती प्रसिद्ध आहे हडप्पा , मोहनजोदडो , लोथल , कालीबंगन , राखीगढी आणि ढोलवीरा ही या संस्कृतीची प्रमुख शहरे होती.

**नगर नियोजन -**या संस्कृतीत ग्रिड पद्धतीचे रस्ते , सुनियोजित निवासीक्षेत्रे , तटबंदी आणि संघटित बाजारपेठा होत्या.

**उत्कृष्ट थापत्यकला -**हडप्पा आणि मोहनजोदडो यासारखी शहरे सुनियोजित बांधकामासाठी ओळखली जातात.

**सुधारित ड्रेनेज आणि पाणीपुरवठा -** या संस्कृतीत सांडपाण्याची व्यवस्था ही अत्याधुनिक होती उत्कृष्ट सांडपाण्याची व्यवस्था आणि नियोजन यासाठी ही संस्कृती प्रसिद्ध आहे.

**शेती आणि व्यापार -**ही प्राचीन भारतीय संस्कृती प्रगत शेती , मातीकाम , व्यापार आणि शहरीकरणासाठी विकसित होती.

**लेखन कला आणि मुद्रा -** या संस्कृतीमध्ये मुद्रा वापरल्या जातअसत , त्याचप्रमाणे एक लिपी वापरली जात असे. दुर्दैव हे की आजतागायत या लिपीचे वाचन इतिहास संशोधकांना करता आलेले नाही.

**ऋग्वेदाची संबंध -** ऋग्वेदात वर्णन केलेल्या सरस्वती नदीच्या काठी वेदरचना झाल्याचे मानले जाते. त्यामुळे या संस्कृतीला भारतीय संस्कृतीची जननी मानली जाते.

**ऐतिहासिक महत्त्व -** ही कास्ययुगीन संस्कृती भारतीय उपखंडातील सर्वात जुन्या नागरी संस्कृती पैकी एक आहे , आणि तिचा विस्तार आधुनिक पाकिस्तान आणि वायव्य भारतात पसरलेला होता.

या प्राचीन संस्कृतीला सुरुवातीस सिंधू नदीकाठी झालेल्या उत्खननामुळे सिंधू संस्कृती हे नाव पडले. परंतु नंतर सरस्वती नदीच्या खोऱ्यात आधुनिक शहरे असल्याचे दिसून आल्याने आता तिला 'सरस्वती सिंधू सभ्यता ' असेही म्हटले जाते.

**वैदिक व मौर्यकालीन स्थापत्यकला :**

वैदिक काळात स्थापत्यकला प्रामुख्याने लाकूड आणि मातीच्या वापराशी संबंधित होती. तर मौर्यकाळात दगडी बांधकामकलेचा विकास झाला. ज्यात स्तूपांची निर्मिती , अशोकाचे स्तंभ , बौद्ध लेणी , आणि भव्य राजवाड्यांचा समावेश होतो. मौर्यकालीन स्थापत्यशैली लाकडावरून दगडाकडे संक्रमण दर्शवते. जी एक शाही कला होती आणि अशोकाच्या काळात याचा अधिक विकास झाला.

वैदिक कालीन स्थापत्य - लाकूड आणि मातीचा वापर होत असे .वैदिक काळात घरे लाकूड आणि मातीच्या भिंतींनी बनवली जात होती . या काळात विटांचाही वापर ज्ञात होता.वैदिक काळात स्थापत्यकाला मुख्यत्वे लाकडावर आधारित होती , ज्यामुळे त्यांचे फारसे अवशेष आज उपलब्ध नाहीत.

**मौर्यकालीन स्थापत्य**

**स्तूप -**मौर्य काळात विशेषतः अशोकाने देशभरात अनेक स्तूपांची निर्मिती केली. हेच स्तूप हे मौर्यकालीन स्थापत्य कलेचे उत्तम उदाहरण आहे.

**अशोकाचे स्तंभ -** अशोकाचे दगडी स्तंभ हे मौर्यकालीन वास्तुकलेचे वैशिष्ट्य होते या स्तंभावरील कलाकुसर लक्षवेधी आहे.

**राजवाडे -**मौर्यकालीन राजधानी पाटलीपुत्रमधील राजवाडे मोठे आणि लाकडी होते. या राजवाड्यामध्ये सोनेरी खांब आणि चांदीचे पक्षी होते. राजवाड्यांच्या भिंतीवर युद्ध , पाण्याचे खड्डे आणि विविध वनस्पतींची सजावट केली जात असे.

**लेणी -** या काळात लेण्यांची निर्मिती करण्यात आली ज्यात मौर्यकालीन स्थापत्य शैलीची झलक मिळते.

**लाकूड ते दगड -** मौर्यकालीन कला ही भारतीय कलेतील लाकडापासून दगडाकडे झालेले एक महत्त्वाचे संक्रमण दर्शवते.

**बौद्ध जैन स्थापत्य कला :**

सांची , भारहुत , अमरावती स्तूप हे बौद्ध धर्मातील आदर्श उदाहरणे , तर अजिंठा , एलोरा येथील गुंफा बौद्ध व जैन परंपरेतील शिल्पकलेचा अद्वितीय संगम.बौद्ध स्थापत्यकलेत स्तूप , विहार आणि लेणी प्रमुख आहेत. जे बुद्धांच्या जीवन आणि शिकवणीसी संबंधित आहेत. जैन स्थापत्यकलेतही लेण्या , स्तूप आणि मंदिरांचा समावेश होतो , पण त्यातही खास वैशिष्ट्ये दिसतात. दोन्ही धर्मांच्या स्थापत्यकलेत शिल्पकला , चित्रकला आणि कोरीवकाम आढळते.

**बौद्ध स्थापत्य कला -**

गौतम बुद्धांच्या शिकवणीचा प्रसार होण्याबरोबरच बौद्ध कलेचा विकास झपाट्याने झाला आणि ती आशिया व जगाच्या इतर भागांमध्ये पसरली.

**प्रमुख वास्तू -**

**स्तूप -** हे बुद्धांच्या निर्वाणानंतर त्यांच्या समाधीवर बांधले गेले आणि हे बुद्ध परंपरांचा महत्त्वाचा भाग आहेत.

**विहार -** हे बुद्ध भिक्खू आणि भिक्खुणींसाठी बांधलेले निवासस्थान किंवा मठ आहेत जे नंतर लेण्यांच्या स्वरूपात कोरले गेले.

**लेणी -** डोंगरामध्ये कोरलेल्या या लेण्या बौद्ध भिक्षूंसाठी ध्यान व राहण्यासाठी वापरल्या जात होत्या.

**वैशिष्ट्ये -** बुद्धांच्या विविध मुद्रा आणि प्रतिमा दगडावरील कोरीव चिन्हे व चित्रे या बौद्ध कलेची वैशिष्ट्ये आहेत.

**जैन स्थापत्य कला -** जैन कलेवर सुरवातीस बौद्ध कलेचा प्रभाव होता मात्र नंतर तिने स्वतःची वेगळी अशी शैली विकसित केली.

**स्तूप -** महावीरांच्या निर्वाणानंतर त्यांच्या समाधीवर स्तूप बांधण्यात आले.

**लेणी -** जैन साधूंच्या निवासासाठी सातवाहन काळात लेण्या खोदल्या गेल्या.

**मंदिरे -** नंतर शिखर मंदिरांचे समूहही जैन स्थापत्यकलेचा भाग बनले.

**वैशिष्ट्ये -** जैन लेण्यांमध्ये व मंदिरामध्ये सेल्फ भीतीचित्रे कोरीव काम यांचा समावेश असतो जे या कलेला एक वेगळे महत्त्व देतात.

**समानता आणि फरक**

**1.समानता -** जैन आणि बुद्ध या दोन्ही धर्मांच्या स्थापत्यकलेत लेण्या आणि स्तुपांचा समावेश आहे. दोन्हीकडे शिल्पकला व चित्रकलेचा वापर आढळतो.

**2. फरक -** बौद्ध स्थापत्य कला मुख्यतः बुद्धांच्या जीवनाशी संबंधित आहे. तर जैन स्थापत्यकलेचा भर तीर्थंकर यांच्या जीवनावर आणि शिकवणीवर असतो. जैन कलेने आकार व घडण याबाबतीत खास वैशिष्ट्ये दाखवली आहेत.

**हिंदू मंदिर स्थापत्यकला**

मंदिर स्थापत्य कला ही भारतीय संस्कृतीचा महत्त्वाचा भाग असून यात गर्भग्रह (मुख्य देवस्थान ) मंडप (सभास्थान ) शिखर आणि वाहनासारखे (देवाचे वाहन ) प्रमुख घटक असतात. मुख्यत्वे नागर , द्रविड आणि वेसर या तीन प्रमुख शैली आहेत. ज्यात प्रदेशानुसार विविधता आढळते. महाराष्ट्रात हेमाडपंथी आणि मराठा यासारख्या स्थानिक शैली विकसित झाल्या आहेत. ज्यात तारेच्या आकाराचे बांधकाम , गुंतागुंतींची कोरीव कामे आणि प्रकाश व सावलीचा वापर केला जातो.

**मुख्य घटक**

**गर्भग्रह -** हे मंदिराचे सर्वात पवित्र आणि मुख्य स्थान असते. जिथे मुख्य देवतांची मूर्ती ठेवली जाते.

**मंडप -** भाविक प्रार्थना , विधी आणि उत्सवासाठी एकत्र जमतात तो खांबाचा हॉल किंवा सभास्थान.

**शिखर -** गर्भग्रहाच्या वर असलेला उंच मनोरा किंवा घुमट.

**वाहन -** मुख्य देवतेचे वाहन , जसे की नंदी हे शंकरासाठी गरुड हे विष्णूसाठी मंदिराच्या समोरच्या भागात असते.

**प्रमुख शैली**

**नागर शैली -** उत्तर भारतात विकसित झालेली शैली खजुराहो मंदिर समूह .

**द्रविड शैली -** दक्षिण भारतात आढळणारी शैली , बृहदेश्वर मंदिर मदुराई मीनाक्षी मंदिर.

**वेसर शैली -** नागर आणि द्रविड शैलीच्या मिश्रणातून तयार झालेली शैली . दक्षिण व मध्य भारतातील होयसळ व चालुक्य वास्तुशैली.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-10| October - 2025

**महाराष्ट्रातील विशिष्ट शैली**

**हेमाडपंती शैली -** या शैलीतील मंदिरे तारेच्या आकाराची किंवा बहुभुज बांधकामासाठी ओळखली जातात . मंदिरांच्या दर्शनी भागावर करवतिच्या दातांचे नमुने असतात. जे प्रकाश आणि सावलीचा सुंदर वापर करतात.

**मराठा शैली -** ही शैली पारंपारिक नागरशैलीचे अनुसरण करते पण त्यात स्थानिक कलाकुसर आणि गुंतागुंतीच्या कोरीव कामांचा समावेश असतो.

**निष्कर्ष -** हिंदू मंदिर स्थापत्यकला ही केवळ एक इमारत नसून ती भारतीय धार्मिक , सांस्कृतिक आणि वास्तुशास्त्रीय परंपरांचे प्रतीक आहे . प्रत्येक मंदिराची रचना ही त्या त्या काळातील आणि प्रदेशातील विचार , श्रद्धा व कलेचे प्रतिबिंब दर्शवते.

**मध्ययुगीन स्थापत्य - इस्लामी प्रभाव :**

मध्ययुगीन भारतीय स्थापत्यवर इस्लामी प्रभाव प्रामुख्याने कमान , घुमट आणि मिनार यासारख्या घटकांच्या समावेशाद्वारे दिसतो. पर्शियन वास्तुकालाशैली आणि भारतीय संसाधने व कौशल्ये एकत्र येऊन एक नवीन 'इंडो-इस्लामिक ' वास्तुकला शैली निर्माण झाली. जी मध्ययुगीन काळात विकसित झाली. या काळात भव्य मशिदी , मकबरे आणि किल्ले बांधले गेले. ज्यांनी भारतीय स्थापत्यकलेस एक नवी दिशा दिली.

**इस्लामी प्रवाहाची प्रमुख वैशिष्ट्ये**

**कमान आणि घुमट -** इस्लामी वास्तुकलेतील कमानींचा वापर इमारतींच्या प्रवेशद्वारांना आणि छतांना आधार देण्यासाठी केला जात असे.

**मिनार -** मशिदींच्या बांधकामात मिनार (उंच मनोरे ) हे एक वैशिष्ट्यपूर्ण घटक म्हणून जोडले गेले. जे इस्लामी धार्मिक विधींशी संबंधित होते.

**नक्षीकाम आणि अलंकार-** इमारतींच्या भिंतीवर आणि खांबावर अरबी लिपीतील कोरीव काम , भूमितीय नक्षीकाम आणि फुलांचे आकृतीबंध यांचा वापर वाढला.

**नवीन वास्तूंचे प्रकार -** मशिदी , दर्गे , दिल्ली सल्तनत व मुघल स्थापत्यकलेत घुमट , मिनार , जाळीदार खिडक्या , कुतुब मिनार , फतेहपुर सिक्री , ताजमहल यासारख्या नवीन प्रकारच्या इमारतींची निर्मिती झाली.

**भारतावरील परिणाम**

**इंडो - इस्लामिक वास्तुकला -** भारतीय स्थानिक शैली आणि पर्शियन इस्लामिक शैली यांचे मिश्रण होऊन एक नवीन ' इंडो - इस्लामिक ' वास्तुकाला शैली उदयास आली. जी मध्ययुगीन भारतात खूप महत्त्वाची ठरली.

**सांस्कृतिक आणि आर्थिक विकास -** या वास्तुकलेचा प्रभाव सांस्कृतिक आणि आर्थिक विकासावर ही झाला. यामुळे नवीन व्यापारी केंद्रे आणि शहरांची निर्मिती झाली. तसेच आर्थिक भरभराट झाली.

**सांस्कृतिक देवाण घेवाण -** इस्लामी स्थापत्य कलेच्या आगमनामुळे भारतीय संस्कृतीत अनेक सामाजिक बदल घडून आले. ज्यात भाषा , कला आणि स्थापत्य यांचा समावेश होतो.

**सारांश**

प्राचीन भारतीय स्थापत्यकालाही केवळ दगड विटांचा संग्रह नसून ती भारतीय समाजाच्या विचार श्रद्धा प्रगतीची साक्षी आहे आजही ती आधुनिक वास्तुशास्त्राला दिशा देते आणि जागतिक स्तरावर भारताच्या सांस्कृतिक ओळखीचा गौरव टिकवून ठेवते.या स्थापत्य कलेने अनेक स्तरावर परिणाम घडवले. धार्मिक श्रद्धा दृढ केल्या , कारागीर व शिल्पकारांना प्रतिष्ठा मिळवून दिली . आणि राजसत्तेच्या सामर्थ्याचे प्रतीक म्हणून भव्य मंदिरे उभी राहिली. प्रत्येक स्थापत्य कृतीने आपल्या काळातील समाजाचे तांत्रिक ज्ञान , आर्थिक स्थैर्य आणि कलात्मक परिपक्वता दाखवली. या प्राचीन वारशाचे संवर्धन म्हणजे भारतीय संस्कृतीचे संरक्षण ,कारण स्थापत्यकलेतच भारताची अमर सांस्कृतिक ओळख कोरली आहे.

**संदर्भ**

1. Brown,percy Architecture, Bombay, D.B.Taraporevala sons,1956.
2. Michell,George. The Hindu Temple, An Introduction to its meaning and forms. University of Chicago press,1988.
3. Fergusson, James. History of Indian and Eastern Architecture London: Jahn Murray.1910.
4. Dehejia, vidya.Early Buddy Rocky Temples: A chronology.cornell. University press, 1972.
5. Soundara Rajan k.y. Indian Temple styles: The personality of Hindu Architecture. Munshiram manoharlal.1972.
6. Grover,satish . The Architecture of India: Buddhist and Hindu vikas publishing House,1980.
7. Gupta,s.p. cultural Tourism in India.Indus publishing,2002.
8. Archacololgial Survey of India.Annual Reports.